14 JUL 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगार संधीच्या दृष्टीने 'एईडीपी' उपयुक्त

## बीओएटी पश्चिम विभागीय उपसंचालक डॉ. एन.एन. वडोदे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

देशात रोजगारवृद्धीसाठी 'अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंमलात येणार आहे. विद्यार्थी दशेतच नोकरीची हमी मिळण्यासाठी हा उपक्रम ठरेल, असे प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या बोर्ड ऑफ अप्रेंटिसशीप ट्रेनिंगचे उपसंचालक डॉ. एन. एन. वडोदे यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. एन. एन. वडोदे. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. महादेव देशमुख, डॉ. जाधव.**

शिवाजी विद्यापीठात एईडीपीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठातील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. वडोदे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पदवीपासूनच विद्यार्थ्यांना रोजगार प्रशिक्षण देण्याचे धोरण आहे. तीन वर्षांच्या पदवीसाठी एक सत्र, चार वर्षांच्या पदवीसाठी दोन सत्रे व्यवसाय–उद्योगामध्ये अप्रेंटिसशीप करणे अनिवार्य आहे. कोल्हापुरात चार हजारांहून अधिक उद्योग आहेत. व्यावसायिक, उद्योजकही विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशीप देण्याबाबत सकारात्मक आहेत. अनेक ठिकाणी विद्यार्थी काम करीत आहेत. विद्यार्थ्यांना संधी आणि भत्त्यासाठी बीओएटी मध्यस्थाची भूमिका बजावेल.

प्र–कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, शिक्षकांनी एईडीपी ही संकल्पना समजून घ्यावी. विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी प्रयत्न करावे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अनेक अभ्यासक्रमांना वरिष्ठ नियामक प्राधिकरणांचे नियम लागू असतात. त्यांच्या मान्यतेखेरीज एईडीपीसंदर्भात पुढे जाणे अशक्य आहे. तरीही बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पारंपरिक अभ्यासक्रमांच्या विनाअनुदानित तुकड्यांपासून अंमलबजावणीला सुरवात करता येईल. त्या अनुषंगाने ३१ जुलैपर्यंत अभ्यासक्रमांची संरचना करावी लागेल. नवोपक्रम, नवसंशोधन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी एईडीपी अभ्यासक्रमाचे सादरीकरण केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. महादेव देशमुख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ज्योती जाधव, प्रमुख, शिक्षक, प्राचार्य, उपस्थित होते.

14 JUL 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंध्यत्वविषयक संशोधनासाठी विद्यापीठाकडून मदत : कुलगुरू

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : 'घटत्या जन्मदरासंदर्भात शिवाजी विद्यापीठ व वैद्यकीय तज्ज्ञांची समिती यांच्या समन्वयातून वंध्यत्वविषयक संशोधन करता येईल. त्यासाठी विद्यापीठाकडून मदतीचा हात पुढे केला जाईल', असे आश्वासन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे दिले.

'वंध्यत्व एक समस्या : योग्य निदान व उपचारांची वाढती गरज' या विषयावर इंडियन सोसायटी ऑफ रिप्रोडॅक्शन शाखा महाराष्ट्र तसेच कोल्हापूर ऑब्सेट्रिक्स अँण्ड गायनाक्लॉजिस्ट सोसायटी यांच्यावतीने दोनदिवसीय वैद्यकीय परिषद घेण्यात आली. त्याचा समारोप येथे झाला. यावेळी डॉ. शिर्के बोलत होते.

डॉ. किरण कुर्तकोटी म्हणाले, 'स्त्री -पुरुष वंधत्व, हार्मोन्स असंतुलन, आधुनिक उपचार पद्धती, जनुकीय चाचण्या अशा विषयांवर या परिषदेत झालेल्या चर्चेमुळे स्त्री रोग तज्ज्ञांना उपचारसेवेतील बदल विचारात घेऊन अधिक सक्षमपणे वंध्यत्व निवारणासाठी दांपत्यांना मार्गदर्शन करणे शक्य होईल. तसेच गरजेनुसार उपचार करण्यासाठी या ज्ञानाचा वापर करता येणार आहे.'

## बैठी जीवनशैली आरोग्यासाठी हानिकारक

■ मानसिक ताणतणाव, बैठी जीवनशैली, व्यायामाचा अभाव, प्रदूषण अशा गोष्टी आरोग्यासाठी हानिकारक ठरत आहेत. त्याचाही प्रजनन क्षमतेवर परिणाम होत आहे. स्त्री – पुरुष दोहोंच्या प्रजनन क्षमता वाढीसाठी आधुनिक उपचारांच्या पद्धतीचा अभ्यास केला पाहिजे', अशी अपेक्षाही डॉ. कुर्तकोटी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षा डॉ. पद्मा जिरगे म्हणाल्या, 'नवीन गर्भनिर्मिती, उपचार तज्ज्ञविषयक अभ्यासक्रम, आयव्हीएफ क्लिनिकल नर्सेसना विशेष प्रशिक्षण असे उपक्रम राबविले जात आहेत. त्यासाठी या वैद्यकीय परिषदेतून उपयुक्त ज्ञान मिळाले आहे. त्याचा उपयोग भविष्यातील वंधत्व निवारणाविषयी उपचार सेवेसाठी होणार आहे.'

परिषदेत झालेल्या विविध चर्चासत्रात टेस्टट्यूब बेबी, वंधत्व निवारण, आधुनिक तंत्रज्ञान, वंधत्वाविषयी नवीन संशोधन, कमीत कमी औषधांचा वापर करून वंधत्व उपचार, या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ. प्रवीण हेंद्रे, डॉ. अमित पत्की, डॉ. केदार गणला, डॉ. तानाजी पाटील, डॉ. रणजित किल्लेदार, डॉ. साधना पटवर्धन, डॉ. चैतन्य शिंबेकर आदींनी परिषदेत सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2025
सकाळ

# माजी विद्यार्थ्यांचे प्रेम ही मोठी संपत्ती : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. १३ : 'शिवाजी विद्यापीठाचे कित्येक माजी विद्यार्थी केवळ देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:बरोबरच विद्यापीठाचे नाव चमकवत आहेत. विद्यापीठाप्रती त्यांचे प्रेमही कौतुकास्पद आहे. त्यामुळे माजी विद्यार्थी कॅम्पसवर येत राहणे आणि त्यांचे नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभत राहणे, ही बाब महत्त्वाची आहे. माजी विद्यार्थ्यांचे लाभत असणारे प्रेम ही विद्यापीठाची मोठी संपत्ती आहे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागातून २००० मध्ये एम.सी.ए. उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अधिविभागात पार पडला. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. स्मिता काटकर यांनी स्वागत केले. डॉ. कविता ओझा यांनी अधिविभागाच्या वाटचालीविषयी माहिती दिली. दुपारच्या सत्रात कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या मेळाव्याला अभिजित जोगळेकर, अभिजित मराठे, चेतन शिंदे, नंदकिशोर जोशी, सुहास मराठे, गौरी पोतनीस, संतोष गोरे, आशिष घाटे, सुजित जाधव, शिवाजी गाढवे, विद्याधर सावळे, सचिन घुगरदरे, अंबुजा साळगावकर, बी. जे. जगदाळे, ए. ए. कलगोंडा, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2025
सकाळ

# प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादीची उद्या प्रसिद्धी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी उद्या, मंगळवारी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर १७ते १९ जुलै दरम्यान कॅम्पसवरील अधिविभागांमध्ये प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही होणार आहे.

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या पहिल्या फेरीत काही जागा रिक्त राहिल्या. त्यामुळे विद्यापीठाने गुरुवारी तंत्रज्ञान अधिविभागात तीन सत्रांमध्ये ओएमआर शीटच्या माध्यमातून पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. एम.एस्सी., केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स, मायक्रोबायोलॉजी, जिओग्राफी, एम.एस. डब्ल्यू., बॉटनी, एम.बी.ए., बायोटेक्नॉलॉजी आदी अभ्यासक्रमांचा समावेश होता.

या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या या परीक्षेसाठी एकूण ११७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १०४४ जणांनी परीक्षा दिली, तर १३२ जण अनुपस्थित राहिले. या परीक्षांचा निकाल आणि गुणवत्ता यादी तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी मंगळवारी प्रसिद्ध होईल. त्यामध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांनी अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांत प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावयाची आहे. या फेरीत पुरेशा प्रमाणात विद्यार्थी अधिविभाग आणि



संबंधित महाविद्यालयांत प्रवेशित होतील, अशी अपेक्षा विद्यापीठाला आहे. ते झाले नाही, तर प्रवेशाची तिसरी फेरी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमांची प्रथम व द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवारी आणि रविवारी सुटीच्या दिवशी या केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहिले. संबंधित कार्यालय सुटी दिवशी सुरू ठेवण्याची ही कार्यवाही १५ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2025
सकाळ

# 'जिल्हा नागरी बँक'तर्फे प्रशिक्षण शिबिर

वाकरे
प्रतिनिधी

राष्ट्रीयकृत नागरी सहकारी बँकांची खाजगी बँकांबरोबर स्पर्धा असून फिनटेक कंपन्यांसोबत आपण एकत्रित काम करू शकतो का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी केले.

गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या 'स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट फॉर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक" या विषयावरील सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात गांगल बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉमर्स व मॅनेजमेंट विभागाचे



**कोल्हापूर: बँक नागरी . बँकांच्या पदाधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल**

डॉ.एस.एस.महाजन होते.

अध्यक्ष गांगल यांनी येत्या चार वर्षात खर्च कमी करण्याचे आव्हान सहकारी बँकांसमोर असल्याचे सांगून बँकांनी आपला सीडी रेशो ६५ टक्केच्या पुढे जाऊ देऊ नये असे सांगितले. राज्यात १४ हजार सहकारी बँक असून त्यांनी अम्ब्रेला ऑर्गनायझेशनचे मेंबर होऊन संघटित होणे गरजेचे असल्याचे सांगितले. बँकांनी तंत्रज्ञानाचा वापर नाही केला तर स्पर्धेत टिकणे अवघड आहे. तरुण वर्गाला बँकेकडे वळवण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. महाजन यांनी शिवाजी विद्यापीठ बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी स्ट्रक्चर प्रोग्रॅम करणार असल्याचे सांगून भविष्यासाठी स्ट्रक्चर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रामचा वापर करावा असे आवाहन त्यांनी केले. नागरी बँक असोसिएशनचे अनिल नागराळे यांनी रिझर्व बँक बिजनेस प्लॅन तयार करा असे सांगत आहे, आपले अंदाजपत्रक हाच बिझनेस प्लॅन असल्याचे ते म्हणाले.

स्वागत डॉ. राजन पडवळ यांनी केले. यावेळी शिक्षु प्रशिक्षण मंडळाचे उपप्रशिक्षण निदेशक एन.एन.वडोदे तसेच अन्य मान्यवरांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला नागरी बँक असोसिएशन व नागरी सहकारी बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2025
सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांना नाट्यशास्त्राचे धडे

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोन ते सात जुलैदरम्यान नाट्य कार्यशाळा घेण्यात आली. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी जितेंद्र देशपांडे आणि अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या हस्ते झाले. पहिल्या दिवशी जितेंद्र देशपांडे यांनी संहिता निवड ते सादरीकरणापर्यंतचे विविध टप्पे विविध उदाहरणांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

दुसऱ्या दिवशी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (दिल्ली) येथून नाट्य प्रशिक्षण घेतलेले नाट्य व चित्रपट कलाकार सलीम मुल्ला यांनी अभिनयातील बारकावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या दिवशी नाट्य अभिनेत्री डॉ. राजश्री खटावकर यांनी 'अभिनय म्हणजे काय?', 'अभिनयाची तोंडओळख' या विषयांवर तर, चौथ्या दिवशी रंगकर्मी व नाट्य प्रशिक्षक डॉ. संजय तोडकर यांनी 'नाटकातील तांत्रिक गोष्टींची तोंडओळख' या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेची आयोजनाची जबाबदारी विकास कांबळे व मल्हार जोशी यांनी सांभाळली.